# महाराष्ट्र शासन

क्रमांक :नियुक्ती-२०२०/प्र.क्र.०२/गृनिभू
गृहनिर्माण विभाग,३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०४ मार्च,२०२०

प्रति,

सह/उप सचिव (आस्थापना)
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**विषय** :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांत मुख्य अधिकारी/उपमुख्य अधिकारी/ सहमुख्य अधिकारी (वर्ग-१) ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन-१२, दिनांक १७.१२.२०१६
२) गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र.प्रतिनि-२०२०/प्र.क्र.२२/गृनिभू, दि.२०.०२.२०२०.

महोदय/महोदया,

राज्य शासनाच्या विविध विभागात/ विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे/ महामंडळातील पदावंर संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्यांबाबतचे नवीन धोरण सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन.शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ अन्वये जाहीर केलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांत खालील तक्त्यात नमूद केलेली सदर कार्यालयांतील पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत :-

| अ.क्र. | पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्या संवर्गाची नांवे |
|---|---|---|---|---|
| म्हाडा प्राधिकरणांतर्गत असलेल्या मंडळावरील पदे | | | | |
| १ | मुख्य अधिकारी | नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,नाशिक | S-२५ : ७८८००-२०९२०० | मंत्रालयीन विभागातील उप सचिव/अपर जिल्हाधिकारी किंवा समकक्ष अधिकारी /समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी. |
| २ | मुख्य अधिकारी | अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,अमरावती | S-२५ : ७८८००-२०९२०० | वरीलप्रमाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | मुख्य अधिकारी | कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पुर्व)मुंबई | S-२५ : ७८८००-२०९२०० | वरीलप्रमाणे |
| ४ | मुख्य अधिकारी | नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,नागपूर | S-२५ : ७८८००-२०९२०० | मंत्रालयीन विभागातील उप सचिव व समकक्ष अधिकारी /समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी. |
| ५ | मुख्य अधिकारी | पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे | S-२५ : ७८८००-२०९२०० | वरीलप्रमाणे |
| ६ | मुख्य अधिकारी | मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ | S-२५ : ७८८००-२०९२०० | वरीलप्रमाणे |
| ७ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व) मुंबई | S-२५ : ७८८००-२०९२०० | मंत्रालयीन विभागातील उप सचिव/अपर जिल्हाधिकारी किंवा समकक्ष अधिकारी /समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी. |
| ८ | सहमुख्य अधिकारी, | मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ | S-२५ : ७८८००-२०९२०० | वरीलप्रमाणे |
| ९ | सहमुख्य अधिकारी | मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन,वांद्रे (पुर्व), मुंबई | S-२५ : ७८८००-२०९२०० | मंत्रालयीन विभागातील उप सचिव/अपर जिल्हाधिकारी किंवा समकक्ष अधिकारी /समतुल्य वेतनश्रेणी मधील अधिकारी. |
| १० | उपमुख्य अधिकारी | पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ | S-२३: ६७७००-२०८७०० | मंत्रालयीन विभागातील अवर सचिव/उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) किंवा समकक्ष अधिकारी /समतुल्य वेतनश्रेणी मधील अधिकारी. |

२. तरी सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील संबंधित अधिका-यांची नावे त्यांच्या मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालांसह, वैयक्तिक माहिती व ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ.माहिती संदर्भाधीन शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबतची माहिती सोबतच्या विहित करण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये या विभागाकडे दि.१८.०३.२०२० पर्यंत निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने कृपया पाठवावीत. इच्छूक अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे याबाबतही कृपया अभिप्राय द्यावेत. आपल्या विभागातून प्रतिनियुक्तीसाठी कोणीही अधिकारी इच्छूक नसल्यास, निरंक असेही कृपया

कळविण्यात यावे.एकदा निवड झालेल्या अधिका-याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही. तसेच, सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की,सदर पत्र त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

३. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या या वेबसाईटवरील संदेशफलक या टॅबखाली प्रसिध्द करण्यात आली आहे.

आपला विश्वासू

Dhanawade 4/3/2020.

(रा.कों.धनावडे)

उप सचिव,महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे.

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्याअंतर्गत म्हाडाच्या क्षेत्रीय मंडळाच्या कार्यालयातील मुख्य अधिकारी/उपमुख्य अधिकारी/सहमुख्य अधिकारी ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासंदर्भात इच्छूकता मागविण्यासाठी विहित करण्यात आलेला नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | अधिकाऱ्याचे संपूर्ण नांव | |
| २. | पदनाम/ संवर्ग<br>पदाची वेतनश्रेणी | |
| ३. | सध्याच्या कार्यालयाचे नांव व पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४. | जन्म दिनांक | |
| ५. | शैक्षणिक अर्हता | |
| ६. | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ७. | ज्या पदावर प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छूक आहे<br>ते पद | |
| ८. | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत) | |
| ९. | संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे ? तसेच, त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार/लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे, | |
| १०. | संबंधित अधिकाऱ्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल किंवा कसे- | |
| ११. | संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १०% पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत किंवा कसे, | |
| १२. | शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१२.२०१६ व दि.१६.०२.२०१८ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे | |